दै. पुण्यनगरी दि. १०.०३.२०२५

# पोलिस दलातर्फे महिला दिनानिमित्त निर्भया रॅली

**नांदेड / प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस दलातर्फे महिला व मुलींमध्ये आत्मविश्वास तसेच निर्भयता वाढवण्यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. ८ मार्च) निर्भया रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वयंस्फूर्तीने अनेक महिला व मुलींनी त्यात भाग घेतला. तसेच पोलीस दलातील महिलाही सहभागी झाल्या होत्या.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त व बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमाला १० वर्ष पूर्ण झाले त्याबद्दल नांदेड पोलीस दलाचे वतीने शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत आयटीआय चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गाने मशाल घेऊन निर्भया रॅलीचे पथसंचलन आयोजन करण्यात आले होते.



सदर निर्भया रॅलीमध्ये विविध शाळा, महाविद्यालयीन, कोचिंग क्लासेसच्या विदयार्थीनी, युवती तसेच महिला संघटना मधील महिला यांनी सहभाग नोंदविला. सदर निर्भया रॅलीत मुलींनी स्वसंरक्षणाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. यासोबतच महिलांनी पोवाडा गीत सादर केले तसेच पोलीस दलात कर्तव्यादरम्यान उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांना नांदेड पोलीस दलाकडून सन्मानित करून त्यांचा गौरव करण्यात आला.

सदर कार्यक्रमास दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेडच्या विभागीय व्यवस्थापक श्रीमती निती सरकार, श्रीमती डॉ. गर्विता सिंह, श्रीमती संस्कृती गुरव यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे निर्भया रॅलीस संबोधित केले. या निर्भया रॅलीत पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, मपोनि अरूणा सुगावे, पोउपनि स्नेहा पिंपरखेडे, माया भोसले, जयश्री गिरे, अश्विनी गायकवाड, नमिता देशमुख, महिला अंमलदार यांच्यासह विद्यार्थीनी, युवती व महिला यांनी सहभाग घेतला होता.

### पोलिस अधीक्षक मुलीसह रॅलीत



निर्भया रॅलीत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची चिमुकली कौतुकाचे केंद्र बनली होती. निर्भया रॅलीत पोलीस अधीक्षक मुलीला स्वतः आपल्या कडेवर घेऊन सहभागी झाले होते. पोलीस अधीक्षक तसेच एका मुलीचे पिता अशा दुहेरी भूमिकेत या रॅलीत ते सहभागी झालेले दिसून आले.